महाराष्ट्र शासन
शासकीय परिवहन सेवा
सर पोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई,
दूरध्वनी :- ०२२-२४९३ १८५६ /०२२-२४९३ २९७२ / ०२२-२४९३ ९५५३ / ई.मेल -gts.worli@gmail.com

---

जा.क्र./ फर्निचर व स.सा.ख. /२०२५/प्र.क्र.-५ /कार्या.रवका/१६६२ दिनांक :-११/१२/२५

नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा,वरळी, मुंबई येथील कार्यालय, कार्यशाळा, वाहतूक विभागात दैनंदिन कामकाजाकरिता अधिकारी कक्ष, कार्यालयाला भेट देणारे अभ्यागत तसेच लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांकरिता उत्तम व दर्जेदार चल / फिरत्या खुर्च्या ( REVOLVING CHAIRS )व अचल खुर्च्या ( FIX CHAIRS ) एकूण ४८ नग खरेदी करणे प्रस्तावित आहे. याकरिता इच्छुक पुरवठादारांकडून खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

नियंत्रक,शासकीय परिवहन सेवा,वरळी,मुंबई येथील कार्यालयाच्या सूचना फलकावर खरेदी तपशिल दिनांक १५/१२/२०२५ सकाळी ११.०० ते दिनांक २३/१२/२०२५ पर्यंत संध्या ३.०० वाजेपर्यंत लावण्यात येतील. महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल.

| अ.क्र. | तपशील | दिनांक,वेळ व कालावधी |
|---|---|---|
| १ | नियंत्रक,शा.प.सेवा कार्यालयात दरपत्रके सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. २३/१२/२०२५ संध्या ३.०० पर्यंत |
| २ | नियंत्रक,शा.प.सेवा कार्यालयात दरपत्रके उघडण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. २३/१२/२०२५ संध्या ४.०० पर्यंत |

अटी व शर्ती :-

- उत्तम व दर्जेदार उत्तम व दर्जेदार चल / फिरत्या खुर्च्या ( REVOLVING CHAIRS )व अचल खुर्च्या ( FIX CHAIRS ) वेगवेगळी प्रती नग न्यूनतम रक्कम अधिक वस्तू व सेवा करासहीत (GST) भरावी.
- पुरवठादार संस्थेने स्ववाहतूक खर्चाने उत्तम व दर्जेदार चल / फिरत्या खुर्च्या ( REVOLVING CHAIRS ) व अचल खुर्च्या ( FIX CHAIRS ) पुरवठा करावा.
- पुरवठादार संस्थेचा वस्तू व सेवाकर क्रमांक, पॅन क्रमांक, उद्यम आधार प्रमाणपत्र तसेच शासकीय संस्थेला पुरवठा करण्यात आल्याचा अनुभव / प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सोबत जोडावीत.
- पुरवठादार संस्थेने मोहोरबंद पाकिटात स्टॅप व स्वाक्षरीसह दरपत्रके या कार्यालयास विहित कार्यालयीन वेळेत सादर करावेत. उशिरा आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.
- पुरवठादार संस्थेने दिलेल्या बँक तपशीलानुसार संगणक प्रणालीद्वारेच देयकांची रक्कम पुरवठादाराच्या खात्यात जमा करण्यात येईल.

उपरोक्त कोणतीही दरपत्रके किंवा अर्ज कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अथवा स्थगित ठेवण्याचे किंवा त्यात सुधारणा करण्याचे अधिकार नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, मुंबई यांनी राखून ठेवले आहेत.

( राजेंद्र भवारी )
नियंत्रक,
शासकीय परिवहन सेवा,मुंबई



